# विकल्प अर्ज भरणे ( ऑप्शन फॉर्म )

विद्यार्थी मित्रांनो, आमच्या संचालनालयातील अधिका-यांनी प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र इत्यादी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहिती देण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागात भेटी देऊन चर्चासत्र आयोजित केले होते. प्रवेश प्रक्रिया कशी होणार यासंबंधी सहयाद्री वाहिनीने कार्यक्रम आयोजित केला होता. जे विद्यार्थी यापासून वंचीत राहिले त्यांच्याकरिता ही माहिती उपलब्ध करुन देण्यांत येत आहे.

१) स्वायत्त संस्थांमध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र नाहीत.

२) विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांला विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म) भरुन देणे बंधनकारक आहे. भरलेला ऑप्शन फॉर्म ॲप्लीकेशन रिसिप्ट सेंटर (एआरसी) मध्ये कन्फर्म करणे आवश्यक आहे. तो कन्फर्म न केल्यास संबंधित विद्यार्थी प्रथम वर्ष अभियांत्रिकी साठी होणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये साठी पात्र ठरणार नाहीत.

३) विकल्प म्हणजे काय?

महाराष्ट्र राज्यामध्ये अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांची यादी या संचालनालयातर्फे माहिती पुस्तकात विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. तसेच सदर माहिती संचालनालयाच्या वेब-साईट **www.dte.org.in** वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ही माहिती वाचताना विद्यार्थ्याने प्रामुख्याने काही बाबींची काळजीपूर्वक नोंद करावी. संस्थांची माहिती देताना प्रत्येक संस्थेला अनुक्रमांक दिलेला आहे. हा अनुक्रमांक देताना विद्यापीठानुसार विभागून दिलेला आहे. तसेच संस्थेतील अभ्यासक्रमांना देखील अनुक्रमांक देण्यांत आलेले आहेत. उदा. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव या संस्थेतील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन या अभ्यासक्रमाकरिता ४०१२३ हा क्रमांक दिलेला आहे.

या क्रमांकामध्ये ४ हा अंक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा करिता आहे

०१ हा क्रमांक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा अंतर्गत असलेल्या संस्थेचा क्रमांक आहे.

२३ हा अंक इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या अभ्यासक्रमाकरिता आहे.

अशाच पध्दतीने महाराष्ट्रातील सर्व संस्थांतील सर्व अभ्यासक्रमांना क्रमांक दिलेले आहेत. ते सर्व क्रमांक माहिती पुस्तकात चॉईस कोड या कॉलम मध्ये नमूद केलेले आहे. हाच अभ्यासक्रम पूणे विद्यापीठातील महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, कोथरुड, पूणे साठी

३११२३ हा क्रमांक दिलेला आहे.

या क्रमांकामध्ये ३ हा अंक पुणे विद्यापीठा करिता आहे.

११ हा क्रमांक पूणे विद्यापीठा अंतर्गत असलेल्या संस्थेचा क्रमांक आहे.

२३ हा अंक इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या अभ्यासक्रमाकरिता आहे.

४) एकाच संस्थेतील दोन किंवा अधिक अभ्यासक्रमासाठी मागणी करावयाची असल्यास विद्यार्थ्यास तितक्याच कोर्सेसकरिता विकल्प एकाच फॉर्ममध्ये पसंतीनुसार द्यावे लागतील. अशारितीने प्रत्येक विद्यार्थी प्रथम फेरी करिता जास्तीत जास्त २० विकल्प भरु शकतो व

कमीतकमी १ विकल्प भरु शकतो. हा विकल्प भरताना विद्यार्थी महाराष्ट्रातील वेगवेगळया विद्यापीठातील संस्था व त्यात चालणा-या अभ्यासक्रमाचे क्रमांक जोडून विकल्प तयार करु शकतो.

५) विद्यार्थ्यांकडून चूक होऊ नये म्हणून माहिती पुस्तकात संस्थेसंबंधी तसेच संकेत स्थळावर सुध्दा सविस्तर माहिती देऊन त्यातील अभ्यासक्रमांची नांवे व अभ्यासक्रमाच्या नावासमोर विकल्पाचा क्रमांक पूर्णपणे लिहिलेला आहे. तेव्हा विद्यार्थ्याने ऑप्शन फॉर्म भरताना माहिती पुस्तकातील तक्त्यातील चॉईस कोड या कॉलम मधील अंक जसाच्या तसा पसंतीनुसार लिहावा. हे प्रथम एका को-या कागदावर लिहून अेआरसी सेंटरमध्ये जावे किंवा आपल्या संगणकावरील अर्जामध्ये भ रुन घ्यावेत म्हणजे आपल्याला व अेआरसीलाही सोईस्कर होईल व वेळ वाचेल.

६) प्रथम फेरीसाठी जास्तीत जास्त २० विकल्प उपलब्ध असून त्यापैकी पहिल्या ९ विकल्पासाठी विद्यार्थ्याने विचारपूर्वक निर्णय घेऊन अशा संस्था व अभ्यासक्रम निवडावेत की, ज्यापैकी कुठलाही १ विकल्प मिळाल्यास सदर संस्थेस व अभ्यासक्रमास प्रवेश निश्चित केला जाणार आहे व तो प्रवेश त्याला बंधनकारक आहे. जर विद्यार्थ्याने पहिल्या ९ विकल्पातील प्राप्त झालेल्या ठिकाणी प्रवेश निश्चित केला किंवा नाही, तसेच ज्या विद्यार्थ्याला विकल्प क्रमांक १० ते २० पैकी एका विकल्पानुसार प्रवेश मिळाला असेल व तो त्याने निश्चित केला असेल (प्रवेश घेतला असेल) अशा विद्यार्थ्यास पुढील सर्व फे-यांमध्ये भाग घेता येणार नाही. त्यामुळे १ ते ९ ऑप्शनमध्ये अलॉटमेंट मिळाल्यास प्रवेश घेणे उचित ठरेल.

७) परंतु १० ते २० विकल्पापैकी कुठल्याही एका विकल्पानुसार प्रवेश मिळाला असल्यास त्यानुसार प्रवेश घेणे सदर विद्यार्थ्यास बंधनकारक रहाणार नाही व असे प्रवेश निश्चित केले नसल्यास सदर विद्यार्थी केंद्रिभूत प्रवेश फेरी क्रमांक २ साठी पात्र ठरतो.

८) अशाच पध्दतीने प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी उर्वरीत दुसरी व तिसरी फेरी राबविली जाणार आहे.

तरी विद्यार्थ्याने या संबंधिचे माहिती पुस्तकातील नियम काळजीपूर्वक वाचावेत व कृतीत आणावेत. विद्यार्थ्याने आपल्याला मिळालेले सीईटीचे गुण, हवा असलेला कोर्स व महाविद्यालय यांची सांगड घालावी. प्रत्येक शाखा तितकीच महत्वाची आहे. आपल्याला कुठल्या शाखेत प्रवेश घ्यायचा ते प्रथम ठरवावे नंतर महाविद्यालये निवडावीत. असे करीत असताना गाईडन्स म्हणून संचालनालयाच्या वेब-साईटवर उपलब्ध असलेल्या मागील वर्षाच्या महाविद्यालय व त्यांच्या अभ्यासक्रमांकरिताचे प्रवेशाचे कटऑफ मार्कस याचीही मदत घ्यावी. काहींना फक्त विशिष्ठ महाविद्यालयातच प्रवेश हवा असेल तर त्या महाविद्यालयातील आपल्याला हवे असलेले अभ्यासक्रमाचे चॉईस कोड ऑप्शन फॉर्म मध्ये प्राधान्याने नमूद करावे.

९) ज्या विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार प्रथम वर्ष अभियांत्रिकी केंद्रिभूत प्रवेश फेरी क्रमांक १,२ व ३ या मध्ये कोणत्याही संस्थेत, कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश मिळाला नसेल असे विद्यार्थी केंद्रिभूत प्रवेश फेरी क्रमांक ४ (कॉन्सिलींग) साठी पात्र ठरतील. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी आतापर्यंत कोणत्याही फेरीसाठी ऑप्शन फॉर्म भरला नसेल व ज्यांची नांवे

महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी, अभ्यासक्रमासाठी जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत असतील अशा विद्यार्थी प्रवेश फरी क्रमांक ४ साठी पात्र ठरतील. पात्र विद्यार्थ्यांनी जाहिराती मध्ये नमूद केलेल्या प्रवेश केंद्रावर स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सदर फेरीमध्ये केंद्रिभूत प्रवेश फेरी क्रमांक १,२ व ३ नंतर अभियांत्रिकीसाठी रिक्त राहिलेल्या जागा उपलब्ध असतील. या संबंधीची माहिती संचालनालयाच्या **www.dte.org.in** वेब-साईटवर उपलब्ध केली जाईल. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी रिक्त जागांची माहिती जाणून घेतल्यानंतरच अभियांत्रिकीसाठी प्रवेश फेरी क्रमांक ४ साठी उपस्थित रहावे. या प्रवेश फेरीसाठी ऑप्शन फॉर्म भरुन देण्याची आवश्यकता नाही. ही प्रवेश प्रक्रिया कॉन्सीलिंग (समुपदेशन) पध्दतीने गुणवत्तेनुसार राबविली जाईल. प्रवेश केंद्रावर सदर विद्यार्थ्याला उपलबध असलेल्या रिक्त जागांची माहिती दिली जाईल. त्यानुसार विद्यार्थ्याला हवी असलेली संस्था व अभ्यासक्रम उपलब्ध असेल तर विद्यार्थ्याने प्रवेश निश्चित करावा.

बिनचुक व सुधारीत माहिती **www.dte.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

संचालक तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई